निसर्ग नियोजन- लोक सहभागाने:

जैवविविधता नोंदणीची कार्य पद्धती व माहिती व्यवस्था

भाग २ - माहिती तक्ते

Contents

तक्ता १: अभ्यास क्षेत्र

पूर्वार्धातील कलम ४.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पीबीआरच्या अभ्यासाकरिता निवडलेल्या क्षेत्राची माहिती ह्या तक्त्यात भरावी.पुढील कोणतेही तक्ते भरण्याच्या आधी अभ्यास क्षेत्रातील मुख्य पोष्टाचा पिन कोड देणे सक्तीचे आहे.

१) अभ्यास क्षेत्राचे नाव - ग्रामपंचायत/नगरपालिकेचे नाव	
२. समाविष्ट वाडी/गाव/मोहल्ला/शहराचे नाव	
३) पंचायत समिती	
४) तालुका	
५) जिल्हा	
६) पिन कोड	
७) स्थळाचा २०११ शिरगणतीतील (Census) क्रमांक	
ग्रामपंचायत इमारतीचे - अक्षांश व रेखांश	

तक्ता २ : अभ्यासक चमू

पूर्वार्धातील कलम ४.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पीबीआरच्या अभ्यास-चमूची माहिती ह्या तक्त्यात भरावी.ह्यात अभ्यास-गटातील प्रत्येक व्यक्तीच्या पीबीआरच्या प्रक्रियेतल्या (एक किंवा अनेक) भूमिका स्पष्ट कराव्या.अशा भूमिकांची यादी तक्त्याच्या खाली दिली आहे.पुढील कोणतेही टाकते भरण्याच्या आधी अभ्यास-चमूतील कमीत कमी एका सदस्याचे नाव देणे सक्तीचे आहे.

१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०
अ.क्र.	पहिले नाव	मधले नाव	आडनाव	लिंग	वय (वर्षे)	पत्ता	गाव/शहर	तालुका	जिल्हा	राज्य	पिनकोड	मोबाइल	इ-मेल	निगडीत संस्था	विशेष ज्ञान/ कौशल्य	भूमिका	सध्याचा मुख्य व्यवसाय	कामाची सुरवात दिनांक	कामाचा शेवट दिनांक

पीबीआर प्रक्रियेतील भूमिका

1) निरीक्षण करून माहिती गोळा करणे
2) अनुभवाच्या आधारे माहिती पुरवणे

3) इतरांनी पुरविलेली माहिती नमूद करणे
4) कागदपत्रांच्या आधारे माहिती गोळा करणे
5) संगणकात माहिती भरणे
6) शास्त्रीय नव पुरविणे
7) देखरेख,मार्गदर्शन,समन्वय

तक्ता ३ व ४ : स्थानिक व बाह्य हितसंबंधी गट

पूर्वार्धातील कलम ४.१२ (हितसंबंधी गट) मध्ये मांडल्याप्रमाणे अभ्यास-क्षेत्राशी संबंधित विविध हितसंबंधी गटांची माहिती ह्या तक्त्यात बहरावी.प्रत्येक हितसंबंधी गट काय काय कामकाज करतो व त्या गटात अंदाजे किती घटक सहभागी आहेत हे नोंदवावे.इथे किती तपशीललाट माहिती उपलब्ध आहे त्याप्रमाणे व्यक्ती/कुटुंबे/गाव किंवा भटके तांडे हे घटक नमूद करावे.उदाहरणार्थ, मेंढा-लेखा गावाच्या क्षेत्रातून बाहेरचे लोक वनोपज गोळा करतात.ह्या बाह्य हितीसाबंधी गटात आसपासची ८ गावे मोडतात.या वेळी संबंधित घटकांची संख्या ८ असेल, तर ‘गाव’हे घटक म्हणून नमूद होईल.

तक्ता ३: स्थानिक हितसंबंधी गट

अ.क्र.	हितसंबंधी गटाचे नाव	महत्वाची कामकाजे (एका हितसंबंधी गटासाठी जास्तीत जास्त महत्वाची २० कामकाजे टाकावीत)	संबंधित घटकांची अंदाजे संख्या (उदा.व्यक्ती,कुटुंब,भटके तांडे,गाव)	घटक
१	२	३	४	५

(४) घटक:व्यक्ती,कुटुंब,भटके तांडे,गाव

तक्ता ४- बाह्य हितसंबंधी गट

अ.क्र.	हितसंबंधी गटाचे नाव	महत्वाची कामकाजे (एका हितसंबंधी गटासाठी जास्तीत जास्त महत्वाची २० कामकाजे टाकावीत)	संबंधित घटकांची अंदाजे संख्या (उदा.व्यक्ती,कुटुंब,भटके तांडे,गाव)	घटक	तपशील
१	२	३	४	५	६

घटक: १) व्यक्ती २) कुटुंब ३) भटके तांडे ४) गाव

तक्ता ५: स्थानिक व बाह्य हितसंबंधी गट/ संस्थांचे परिणाम व प्रेरक

पूर्वार्धातील कलम ४.१२, तसेच ४.१३ (हितसंबंधी संस्था) मध्ये सोडल्याप्रमाणे अभ्यास-क्षेत्राशी संबंधित विविध हितसंबंधी गट व संस्थांची अधिक माहिती ह्या तक्त्यात तक्ता येईल.गटांचे/संस्थांचे परिणाम वेगवेगळ्या हस्तकांद्वारे घडत असल्यास संबंधित प्रेरक,मध्यस्थ व कामकरी कोण हे नमूद करावे.प्रत्येक गटाचा/संस्थेचा निसर्गावर किती परिणाम होतो आणि तो परिणाम कसा आहे (इष्ट अथवा अनिष्ट,

चांगला की वाइट) हेही स्पष्ट करावे. उदा.बाहेरच्या छोट्या छोट्या वस्तु विकणारा गट कदाची स्थानिक निसर्गावर कोणताही परिणाम करत असेल, तर यालागाटचा सिमेंटचा कारखाना स्थानिक निसर्गावर फार वाईट परिणाम करत असेल.

अ.क्र.	हितसंबंधी गट (स्थनिक/बाह्य)	प्रेरक	मध्यस्थ	कामकरी	परिणाम	परिणामाचे प्रमाण
	१	२	३	४	५	६

५ परिणाम

१) चांगला
२) वाइट
३) माहित नाही

६ परिणामाचे प्रमाण

१) जास्त
२) साधारण
३) कमी

तक्ता ६: भटक्या समूहांची माहिती

पूर्वार्धातील कलम ४.१४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे गावाला नियमित भेट देणाऱ्या भटक्या लोक-समूहांची माहिती ह्या तक्त्यात आपल्याला नोंदवायची आहे.ह्यात हे भटके लोक कुठल्या मूळ गावाचे आहेत,त्यांच्या तांड्यात कोण-कोण असतात व अभयद –क्षेत्रात अथवा

जवळजवळ ज्या ठिकाणी (ज्या भूभाग-अंशावर) हे लोक मुक्काम करतात त्या ठिकाणाची माहिती नोंदवायची आहे,ह्यासोबतच हे लोक पशुपालानावर अवलंबून आहेत का,तसेच ही भटकंती पारंपारिक आहे की नव्याने सुरु झालेली आहे हे स्पष्ट करावे.प्रत्येक भटक्या समूहासाठी वेगळा तक्ता बनवावा.

अ.क्र.	समूहाचे अभ्यास –क्षेत्रात वापरले जाणारे नाव	मूळ गावाची माहिती					भटके प्रकार		तांड्याची रचना		
		गाव/पंचायत	तालुका	जिल्हा	पिन कोड	राज्य	परंपरा	पशुपालन	समूहाचे स्वत:चे नाव	पुरुषांची संख्या	स्त्रियांची संख्या

पुढे सुरू:

अ. क्र.	आपल्या गावाजवळील जवळच्या मुक्कामाच्या ठिकाणाची माहिती								
	जवळच्या पोस्टाचा पिनकोड	गावाचे व जिल्ह्याचे नाव	लोकवस्तीपासुनचे अंतर	वर्षात किती वेळा येतात	भूभाग/जलभाग घटक	थांबण्याचा कालावधी	पासून (महिना/नक्षत्र)	पर्यंत (महिना/नक्षत्र)	भटक्यांच्या दृष्टीने या जागेचे महत्व

परंपरा
१)भ्रमंती पारंपारिक
२) भ्रमंती अंशत:पारंपारिक
३) भ्रमंती नव्याने सुरु झालेली

पशुपालन
१) पशुपालन महत्वाचे
२) पशुपालन गैरमहत्वाचे

तक्ता ७: भूभाग/जलभाग प्रकार-उपप्रकार

पूर्वार्धातील कलम ४.५ मध्ये सुचविल्याप्रमाणे पीबीआरच्या कामाची सुरुवात अभ्यासक्षेत्राचा नकाशा बनवण्यापासून होईल.पूर्वार्धातील कलम ४.६ मध्ये मांडल्याप्रमाणे ह्या नकाशाच्या एका थरात भूभाग-जलभागांच्या वेगवेगळ्या अंशाना अथवा तुकड्यांना परिसर – विज्ञानाच्या दृष्टीकोनातून वापरल्या जाणाऱ्या भूभाग-जलभाग प्रकारांच्या संज्ञा वापरून नोंदवले असेल,व विशिष्ट क्रमांक अथवा कोड नंबर दिलेला असेल.ही अभ्यास-क्षेत्रातल्या भूभाग व जलभाग प्रकारांची व उपप्रकारांची माहिती तक्ता करा.७ मध्ये नोंदवली जाईल.प्रत्येक प्रकार/उप्प्रकारासाठी स्वतंत्र तक्ता बनवावा.

ह्या तक्त्याच्या वेगवेगळ्या रकान्यात पुढील माहिती भरावी:१) प्रकारचे नाव (४.६ मधील प्रमाणित यादीतून) २) प्रकराचे स्थानिक नाव ३) जर काही उपप्रकार ठरवले असतील तर त्याचे नाव ४) उप्प्रकाराचे स्थानिक नाव ५) ह्या प्रकार / उपप्रकारासंदर्भात मोडणाऱ्या सुट्या सुत्या तुकड्यांची संख्या (भूभाग/जलभाग अंश) ६) प्रत्यके प्रकार / उप्प्रकाराच्या अनेक तुकड्यांमधून अधिक अभ्यासासाठी निवडलेल्या अंशाचे स्थानिक नाव ७) अशा विविध घटकांना दिलेला कोड नंबर ८) ह्या निवडक घटकांचा अक्षांश ९) रेखांश व १०) समुद्र सपाटीपासून उंची ११) निवडक तुकड्यांचे सर्व्हे क्रमांक व १२) ह्या भूभाग प्रकार / उपकारशी निगडीत हितसंबंधी गट.उदाहरणादाखल: मेंढा गावातील जंगल ह्या प्रकारचा विचार करू या. ह्या प्रकाराला स्थानिक भाषेत (गोंडी) गेडा म्हणतात. ह्याचे उपप्रकार होतील विरळ जंगल, मिश्र दात जंगल, गवताळ जंगल,मिश्र विरळ जंगल,सागवान-बहुल जंगल,बांबू – बहुल जंगल,व डोंगरावरचे जंगल, गवताळ जंगल ह्या उपप्रकारांतर्गत १ अंश (घटक)-खरा गोटा गेडा हा आढळतो. हा अधिक अभ्यासासाठी निवडला आहे.ह्या उपप्रकारशी प्रामुख्याने वनोपज-संग्राहक हा हितसंबंधी गट निगडीत आहे.

अ. क्र.	भूभाग/जल भाग प्रकार (प्रमाणित यादीतून)	प्रकारचे स्थानिक नाव	भूभाग/जल भाग उपप्रकार	उपप्रकारचे स्थानिक नाव	अभ्यास-क्षेत्रात ह्या प्रकारांतर्गत मोडणाऱ्या भूभाग/जल भाग अंशांची (घटकांची) संख्या	निवडक अंशां (घटकां)बद्दल विशेष माहिती						निगडीत हितसंबंधी गट
						अधिक अभ्यासासाठी निवडलेल्या अंशाचे स्थानिक नाव	अधिक अभ्यासासाठी निवडलेल्या अंशाचे नकाशावर दाखवलेले कोड नंबर	अक्षांश (Deg Min Sec)	रेखांश(Deg Min Sec)	उंची (मीटर)	सर्व्हे नंबर	
	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२

भूभाग- जलभाग प्रकार (प्रमाणित यादी)

१) गवताळ रान: मुख्यत: गवताचे आच्छादन असलेला भूभाग

२) झुडपी माळरान: विखुरलेली झुडुपे असलेले रान

३) झाडोरे माळरान: विखुरलेली झाडे असलेले रान

४) झाड-झाडोरा: दात झुडुपे व थोडे झाडे असलेले रान

५) जंगल: दात झाडी असलेले रान

६) शेती: हंगामी पिके पिकणारी जमीन

७) बागायत: फळबागा (आंबा ,संत्रे) अथवा रोप वने (सागवान,कॅशुरीना, निलगिरी)

८) खडकाळ भूमी: उघडा-बोडका खडकाळ प्रदेश

९) दाट वस्तीचा भाग

१०) विरळ वस्तीचा भाग

११) ओढे, नद्या

१२) कालवे

१३) नैसर्गिक तळी

१४) मनुष्यनिर्मित तलाव, धरणे

१५) खाड्या

१६) दलदलीचा प्रदेश

१७) समुद्र

१८) भूजल

१९) खडकाळ समुद्रकिनारा

२०) वालुकायुक्त समुद्रकिनारा

२१) चिखलाट समुद्रकिनारा

२२) खारफुटी रान

२३) बाजारपेठ

२४) गुदामे

२५) कारखाने

२६) जैवविविधतेचे खास साठे-उदा.प्राणिसंग्रहालये ,उद्याने

२७) पशुउत्पादक भूमी – उदा.डेअऱ्या, पोल्ट्री

तक्ता ८: स्थानिक जैव विविधता

पूर्वार्धातील कलम ४.१० मध्ये चार्चील्याप्रमाणे स्थानिक जैवविविधतेची नोंदणी ह्या ताक्त्यापासून सुरु होईल.ह्यात आपण लोकांना माहित असलेल्या सर्व जाती/प्रजातींची अथवा अधिक समावेशक वर्गाची (उदा.गांडुळे किंवा गावात) माहिती गोळा करणार.ह्या विस्तृत

यादीतून अधिक अभ्यासासाठी काही जाती/प्रजाती/वर्ग निवडणार.उदाहरणादाखल मेंढा-लेखातील मोह ह्या जातीची माहिति बघू या.स्थानिक गोंडा भाषेत ह्याला इरपी म्हणतात व सपुष्पी वनस्पतीच्या प्रकारात हे मोडते.मोह ही शास्त्रीय दृष्ट्या जाती आहे.ह्याचे शास्त्रीय नाव मधुका इंडिका आहे.स्थानिक लोकांना ह्याचे खूप जास्त महत्व आहे.मोहा हे वन्य , व संगोपित अथवा लाग्वादितल्या , या दोन्ही प्रकरात मोडते.मोहाच्या उपयोगाची यादी लांबलचक आहे;हे अन्न म्हणून , बियांपासून तेल काढण्यासाठी, पानांपासून पत्रावळी बनविण्यासाठी , पूजेसाठी वापरात आणतात.ह्यापासून कोणताही त्रास नसून याला दोन्ही प्रकारच्या अधिक अभ्यासासाठी (संख्यात्मक व गुणात्मक) लोकांनी सुचविले.आणखी एक उदाहरण म्हणून गांडूळ घेऊ या.ह्याचे गोंडी नाव नारवंज आहे .हा जीवांच्या ‘कंकणी ‘ प्रकारापैकी आहे.सर्व गांडुळे ऑलिगोचिटा या वर्गातील (क्लास) आहेत.तेंव्हा वर्गीकरणासाठी पातळी ही ‘वर्ग’ ही असेल.याला स्थानिक महत्व मर्यादित आहे.गांडुळे वन्य आहेत.लोकांच्या दृष्टीने मासे पकडायला गळाला लावणे हा एकच उपयोग आहे.गांडुळे ही अधिक अभ्य्सासाठी निवडली नाहीत.या यादीत लागवडीखालील अथवा पाळीव वनस्पती-प्राण्यांची फक्त जाती द्यायची आहे.उद.बैलांपैकी खिल्लारी, अथवा आंब्यापैकी ह्या तपशीलात जायचे नाही.तो तपशील तक्ता २२ मध्ये येईल.येथे केवळ बैल किंवा आंबा अशी जाती नोंदवायची आहे.यातील वर्गीकरण पटली व जीवाचे शास्त्री नाव ही माहिती नमूद करणे सक्तीचे नाही.विशेषतज्ञांच्या मदतीने ही माहिती जमेल तशी नोंदवावी.

अ.क्र.	जीवाचे स्थानिक नाव	जीवाचा प्रकार	वर्गीकरण पातळी उदा.वर्ग,कुल इत्यादी	जीवाचे शास्त्रीय नाव	स्थानिक महत्व	वन्य (नैसर्गिक), संगोपित (लागवडी खालील, पाळीव) अथवा दोन्ही	जीवाच्या स्थानिक नावाची भाषा	प्रमुख उपयोग	प्रमुख उपद्रव	जीवाचे सध्याचे प्रमाण (खूप कमी / कमी /मध्यम / भरपूर	मागील दहा वर्षातील फरक	फरकाची कारणे

विकल्प तक्ता

जीवांचे प्रकार

अ.क्र.	जीवाचे प्रकार
१.	जीवाणू/विषाणू
२.	शेवाळ (अल्गा)
३.	शेवाळ (मॉस)
४.	दगडफूल (लायकेन)
५.	बुरशी/अळिंबे
६.	नेचे
७.	अपुष्प वनस्पती
८.	सपुष्प वनस्पती
९.	कृमी
१०.	कंकणी-उदा.गांडूळ
११.	मृदुकाय-उदा.गोगलगाई,कालवे
१२.	कीटक
१३.	कोळी
१४.	कवची (खेकडा, झिंगे)

वर्गीकरणाच्या पातळ्या

अ.क्र.	विभाग
१.	किंगडम
२.	फायलम
३.	सब-फायलम
४.	क्लास (वर्ग)
५.	सब-क्लास (उप-वर्ग)
६.	ऑर्डर
७.	सब-ऑर्डर
८.	फॅमिली(कुल)
९.	सब- फॅमिली (उप-कुल)
१०.	जीनस (प्रजाती)
११.	स्पेसीज (जाती)
१२.	सब-स्पेसीज / व्हरायटी (उपजाती,वाण)

स्थानिक महत्व

१	अत्यंत महत्वाचे
२	साधारण महत्वाचे
३	महत्वहीन
४	साधारण हानिकारक
५	अत्यंत हानिकारक

१५.	अन्य कणाहीन
१६.	मासे
१७.	उभयचर
१८.	सरीसृप
१९.	पक्षी
२०.	सस्तन प्राणी

तक्ता ९: जैविक संसाधने

विशिष्ट जातीखेरीज उपयोगी (उदा. सरपण-जळवण, चारा) तसेच उपद्रवी (उदा.तण) संसाधनाचाही अभ्यास करायचा आहे.ज्या संसाधनाचा जास्त अभ्यास करावयचा नाही,त्यांची नोंद या तक्त्यात करण्याचे कारण नाही,कोणत्याही एका संसाधनात अनेक जीवांचा/जातींचा समावेश होईल.ह्यांची मूळ नोंद तक्ता ८ मध्ये झालेली असेल.माहिती असेल त्याप्रमाणे एखाद्या संसाधनात तक्ता ८ मधील कोणते जीव अंतर्भूत आहेत हे नमूद करावे.जे जीव महत्वाचे आहेत ,आणि त्यांचा स्वतंत्र अभ्यास करणे उचित आहे.त्यांना एखाद्या समावेशक संसाधनाचा अंश म्हणून धरू नये.उदा.मेंढा-लेखातील ‘वनोपज’नावाचा गट विचारात घेऊ या.ह्या गटात मोहा,तेंदू,बांबू,मधमाशा,शतावरी,हिरडा,चार,बेहेडा इत्यादी अनेक जातींचा समावेश होईल.त्यातील मोहा,तेंदू,बांबू,मध ह्या सर्वांचा स्वतंत्र अभ्यास होईल.केवळ शतावरी,हिरडा,चार,बेहेडा इत्यादिना मिळून इतर वनोपज म्हणून अभ्यासता येईल.

अ.क्र.	अधिक अभ्यासासाठी निवडलेल्या जैविक संसाधनाचे स्थानिक नावं (उदा.सरपण,तण इत्यादी)	समाविष्ट जीवांचे स्थानिक नाव	स्थानिक नावांची भाषा	महत्वाचे उपयोग	महत्वाचे उपद्रव
१	२	३	४	५	६

तक्ता १०: सामान्य माहिती

पूर्वार्धातील कलम क्रमांक ४.९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अभ्यास- क्षेत्राची साम्मान्य माहिती ह्या व पुढील तक्त्यात नोंदवायची आहे.यात वापरल्या जाणाऱ्या भाषा, शैक्षणिक व स्वयंसेवी संस्था, उपलब्ध खनिजे व प्रदूषण इत्यादींचा समवेश होईल.(तक्ता पुढील पानावर)

भाषा

अ.क्र.	भाषा	बोली भाषा	शिक्षणाची भाषा
	१.१	१.२	१.३

शैक्षणिक संस्था

अ.क्र.	शैक्षणिक संस्थेचे नाव	संपर्क व्यक्ती	पद
	२.१	२.२	२.३

उपलब्ध खनिज

अ.क्र.	खनिज	खाणीचे क्षेत्रफळ (हेक्टर)
	३.१	३.२

स्वयंसेवी संस्था

अ.क्र.	स्वयंसेवी संस्था	संपर्क व्यक्ती
	४.१	४.२

प्रदूषणाचा स्रोत व पातळी

अ.क्र.	वायू/जळ/ध्वनी/माती	स्रोत	पातळी
	५.१	५.२	५.३

५.३ पातळी – १) जास्त २) साधारण ३) कमी

तक्ता ११:इतिहास व संस्कृती

पूर्वार्धातील कलम क्रमांक ४.९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ह्या तक्त्यात अभ्यस – क्षेत्राच्या इतिहासाची , तिथल्या लोक-समूहाच्या इतिहासाची, अभ्यास-क्षेत्रात स्थायिक झालेल्या लोकांची, निसर्गाशी संबधित विविध सणांची, पारंपारिक गाणी, नृत्य व म्हणींची शक्य होईल तितकी माहिती टाकावी.पेबिंको डेटाबेस मध्ये निसर्गाशी संबंधित पारंपारिक गाण्यांची ध्वनीफित व निसर्गाशी संबधित नृत्याची चित्रफीत भरण्याची सोय केली आहे, तेंव्हा जिथे शक्य आहे तिथे अशा प्रकारची नोंदणी करावी.

१	अभ्यास-स्थानांचा इतिहास	
२	अभ्यास क्षेत्रातील समाजांचा इतिहास	
३	बाहेरून आलेल्यांचा इतिहास	
४	अभ्यास-क्षेत्र सोडून गेलेल्यांचा इतिहास	
५	निसर्गाशी संबंधित सन/उत्सव	
६	उत्सवात उपयोगी जैविक संसाधने	
७	निसर्गाशी संबंधित गाणी	

८	निसर्गाशी संबंधित नृत्य	
९	निसर्गाशी संबंधित वाक्प्रचार / म्हणी	

तक्ता १२ अ : जिव्हाळ्याचे मुद्दे

पूर्वार्धात कलम ४.८ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे वेगवेगळ्या हितसंबंधी गटांच्या नैसर्गिक संसाधनांशी निगडीत असलेल्या जिव्हाळ्याचा मुद्द्यांची माहिती ह्या तक्त्यात भरावी.एखादा मुद्दा हा गावातील सर्वच हितसंबंधी गटांचा मुद्दा असेल असे नाही, तेंव्हा अमुक मुद्दा कोणत्या गटाचा आहे हे स्पष्ट करावे.तसेच तो मुद्दा कोणत्या भूभाग/जलभाग घटकाशी आणि कोणत्या जिवांशी किंवा जैविक संसाधनाशी संबंधित आहे हेही स्पष्ट करावे.

उदाहरणादाखल मध्यप्रदेशातील राणी पिपरिया गावात ‘ शेतीला रानडुक्करांचा त्रास’ हा जिव्हाळ्याचा मुद्दा आहे.हा मुद्दा ‘शेतकरी’ ह्या हितसंबंधी गटाचा आहे/शेती,जंगल हे संलग्न भूभाग घटक ह्या मुद्द्याशी संबंधित असून ‘रानडुक्कर,पीक’ हे संलग्न जीव किंवा जैविक संसाधन आहेत.

अ.क्र.	मुद्दा	तपशील	संबंधित हितसंबंधी घटक	संबंधित भूभाग /जलभाग अंश (घटक)	संबंधित जीव (जाती अथवा जैविक संसाधने	
					प्रभावित संबंधित जीव जाती	प्रभावित संबंधित जैविक संसाधने
	१		२	३	४.१	४.२

तक्ता १२ ब: वन्यप्राणी व मानव संघर्ष

येथे आपण अशा घटनांचे तपशीलवार दस्तऐवजीकरण करणार आहोत जिथे वन्य प्राण्याने मानवांवर / पशुधनावर / पिकांवर हल्ला केला आहे. ज्या घटना गेल्या काही वर्षांत घडल्या असतील त्या नोंदवायच्या आहेत.

१. मानवावर हल्ला

क्र.	प्राणी हल्ला	घटनेचा तपशील	घटनेची तारीख	टापूचे नाव	अक्षांश	रेखांश	भूभाग / जलभाग	पुरुषांच्या मृत्यूची संख्या	महिलांच्या मृत्यूची संख्या	बालमृत्यूंची संख्या	जखमींची संख्या	मृत्यूसाठी भरपाईची रक्कम (रु.)	जखमांसाठी भरपाईची रक्कम (रु.)

२. पाळीव पशुवर हल्ला

क्र.	प्राणी हल्ला	घटनेचा तपशील	घटनेची तारीख	टापूचे नाव	अक्षांश	रेखांश	भूभाग / जलभाग	मृत्यू: प्राणी आणि त्यांची संख्या	जखम : प्राणी आणि त्यांची संख्या	रक्कम (रु.) पंचनाम्यात ठरवली	पशुधन मालकाच्या अंदाजानुसार नुकसानीची रक्कम (रु.).	मिळालेल्या भरपाईची रक्कम (रु.)

३. पिकाचे नुकसान

क्र.	प्राणी हल्ला	घटनेचा तपशील	घटनेची तारीख	टापूचे नाव	अक्षांश	रेखांश	पिकांचे नाव आणि नुकसानीचे क्षेत्र	भरपाईसाठी अर्ज न केल्यास कारणे	रक्कम (रु.) पंचनाम्यात ठरवली	शेतकऱ्याच्या अंदाजानुसार नुकसानीची रक्कम (रु.).	मिळालेल्या भरपाईची रक्कम (रु.)

तक्ता १३:निवडक भूभाग –अंशांची प्रत्यक्ष पाहणी

पूर्वार्धातील कलम ४.१६ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नकाशात दाखवलेल्या निवडक भूभाग व जल भाग अंशांची किंवा तुकड्यांची पाहणी करून माहिती गोळा करायची आहे. यात त्या त्या जागी प्रत्यक्ष जाऊन तेतील जमिनीचा पृष्ठभाग कसा आहे. तिथे काय काय कामकाजे होतात,लोकांनी काय काय भर घातली आहे, काय काय परिवर्तने केली आहेत, कोणकोणत्या गोष्टींचे दोहन केले आहे, आणि त्या विशिष्ट भूभाग-अंशापासून कोणता लाभ अथवा हानी होते, लाभदायक अथवा हानिकारक जीवांचे प्रमाण काय आहे व त्यात काय बदल होत आहेत इत्यादि गोष्टींचे निरीक्षण करावायचे आहे.

उदाहरणादाखल मेधा-लेखातील ‘जंगल’हा भूभाग- प्रकारांतर्गत मोडणाऱ्या ‘एटजेर’ ह्या भूभाग अंशाचा-जंगलाच्या तुकड्याचा विचार करू या.ह्याचे क्षेत्रफळ अंदाजे २०० हेक्टर असून इथल्या जमिनीची रचना डोंगराळ आहे.इथून स्थानिक लोक वनोपज गोळा करतात.इथे लोकांनी कोणतीही भर घातली नसून माती वाहून न जावी म्हणून गली प्लग बनविले आहेत.इथून लोक बांबू आणि अन्य वनोपजांचे दोहन करतात.इथून लोकांना वनोपज, औषधी वनस्पती, मध हे ‘लाभ’ मिळतात ,तर आसपासच्या शेतीला इथे वास्तव्यास असणाऱ्या रानडुक्करांपासून हानी होते.

अ.क्र.	भूभाग प्रकार	उपप्रकार	भूभाग प्रकाराचे स्थानिक नाव	घटकाचे स्थानिक नाव	नाकाशावरील कोड नंबर	अक्षांश - रेखांश	जमिनीची रचना (सपाट/तीव्र उतार किंवा चढ / उंच-सखल)	एकूण क्षेत्रफळ	महत्वाची कामे	महत्वपूर्ण बदल	या बदलामुळे लाभ	या बदलामुळे हानी
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13

भूभाग प्रमाणित यादी

१	गवताळ रान

२	झुडपी जंगल
३	खूप कमी वृक्ष असलेले जंगल
४	दाट वृक्ष असलेले जंगल
५	मध्यम वृक्ष असलेले जंगल
६	विरळ वृक्ष असलेले जंगल
७	खडकाळ भूमी
८	वस्ती
९	शेती
१०	नदी
११	तलाव
१२	खाड्या
१३	दलदल
१४	समुद्रकिनारा

तक्ता १४: वृक्ष जातींचा आणि झुडुप, शाक वनस्पतींचा संख्यात्मक अभ्यास

पूर्वार्धातील कलम ४.१७ अ मध्ये चार्चील्याप्रमाणे वृक्ष जातीची संख्यात्मक पहाणी करावयाची आहे.प्रत्यक्ष पाहणीसाठी निवड्लेल्या भूभाग-अंशावर सुमारे 10 नमुना बिंदूवर जाऊन त्या बिंदूपासून चार चतकोरात सर्वात जवळचा वृक्ष किती अंतरावर आहे हे मोजायचे व त्याचा छातीच्या इंचीवर घेर नोंदवायचा आहे.

तक्ता १४ अ: वृक्ष जातींचा संख्यात्मक अभ्यास:

भूभागाचे नाव :

भूभाग ज्यात आहे त्या टापूचे नाव:

बिंदू आधारित चतकोर पहाणी निरीक्षणे :

अ. क्र.	नमुना बिंदू क्रमांक	चतकोर	जवळच्यावृक्षाची जात (स्थानिक नाव)	शास्त्रीय नाव	वृक्षाचे बिंदू पासून अंतर	छातीच्या उंचीवर n या फांदीचा घेर C_n (सें.मी.)										परिणामी बुंधा क्षेत्रफळ (A) sq. cm. (सुत्राद्वारे काढावे)
						1	2	3	4	5	6	7	8	9	10	
																0
																0
																0
																0
																0
																0
																0
																0
																0
																0

सूत्र $A = \sum C_n \times C_n / (4 \times \pi)$

वरील निरीक्षणांवरून वृक्ष संख्येचा प्रति हेक्टरी अंदाज :

अ. क्र..	वृक्षाची जात	प्रति हेक्टर संख्या	बुंधा क्षेत्रफळ प्रति हेक्टर (चौ. मी.)
	एकूण		

तक्ता १४ ब: झुडपांच्या संख्येचा आणि शाक वनस्पतीचा संख्यात्मक अंदाज :

पूर्वार्धातील कलम ४.१७ अ मध्ये चर्चा केल्या प्रमाणे ह्या बिंदूवर कितपत शाक व झुडप वनस्पती आहे यांचा संख्यात्मक अंदाज घेण्यासाठी आकृती 3 मध्ये दाखविल्याप्रमाणे प्रत्येक बिंदुवर 1 मी. X 1 मी. आणि 10 मी. X 10 मी. असे दोन चौरस आखायचे आहेत. त्यात पुढील प्रमाणे निरीक्षणे नोंदवायची आहेत.

भूभाग प्रकार : भूभाग उपप्रकार:

भूभागाचे स्थानिक नाव :

		1 मी. X मी. चौरसातील रोपांची निरीक्षणे			१०मी x १०मी चौरसातील झुडुपांची निरीक्षणे			
नकाशा वरील कोड नंबर	नमुना बिंदू क्रमांक	रोपाची जात	रोपांची संख्या	मध्यम उंची (से.मी.)	झुडुपांची जात	झुडुपांची संख्या	मध्यम उंची (से.मी.)	मध्यम आच्छादन क्षेत्रफळ (चौ. मी.)

शाक वनस्पतींचा संख्यात्मक अंदाज :

जात	प्रति हेक्टर संख्या	(#) मध्यम ऊंची (cm)	Q1	Q2	Q3

झुडुप वनस्पतींचा संख्यात्मक अंदाज:

झुडुपांची जात	प्रति हेक्टर संख्या	(#) मध्यम ऊंची (cm)	(#) मध्यम विस्तार (sq.m)	चतुर्थकात ऊंची (cm)			चतुर्थकात विस्तार (sq.m)		
				Q1	Q2	Q3	Q1	Q2	Q3

(#) प्रजाती आढळलेल्या चौरसांची संख्या 3 किंवा त्यापेक्षा कमी असल्यास, आपल्याला चतुर्थक सापडणार नाहीत. अशा स्थितीत प्रत्येक चौरसासाठी प्रति हेक्टर वनस्पतींची संख्या आणि मध्यम उंची स्वतंत्रपणे नमूद करा. 4 किंवा 4 पेक्षा जास्त चौरसात जाती आढळल्यास या सर्व चौरसांसाठी चतुर्थक 1, चतुर्थक 2 आणि चतुर्थांश 3 एकत्रितपणे मोजा आणि चौरसासाठी स्वतंत्रपणे मध्याचा उल्लेख करू नका.

तक्ता १५: निवडक जलभाग-अंशाची प्रत्यक्ष पाहणी

पूर्वार्धातील कलम ४.१६ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नकाशात दाखवलेल्या निवडक भूभाग व जालभाग अंशाची पाहणी करून माहिती गोळा करायची आहे. यात त्या त्या जागी प्रत्यक्ष जाऊन, जर नदी- नाला असेल तर अभ्यास क्षेत्राखाली लांबी किती, नदी नाल्यांची रुंदी किती, पाण्याची खोली किती, जर तलाव असेल तर पाण्याचा विस्तार किती; लोकांना विचारून गेल्या सबंध वर्षात पूर किती कालावधीसाठी आला होता, पाण्याची उपलब्धता किती काल असते, तिथे काय काय काम्काजे होतात, लोकांनी काय काय भर घातली आहे, काय काय परिवर्तने केली,

कोणकोणत्या गोष्टींचे दोहन केले आहे आणि त्या विशिष्ट जालभाग अंशापासून कोणते लाभ अथवा हानी होते, इत्यादी गोष्टींचे निरीक्षण करायचे आहे.

मेंढा-लेखाजवळील कठाणी नाधीचे उदाहरण आपण घेऊ या. ह्या नदीच्या पात्रातील ‘वादादिन’ नावाचा जलभाग- अंश लोकांनी महत्वाचा म्हणून सांगितला होता. हा जालभाग अंश ‘नद्या /ओढे’ ह्या जलभाग प्रकारांतर्गत मोडतो, तर ‘नदी’ ह्या उपप्रकारांतर्गत हे ठिकाण मोडते.ह्या ठिकाणी मागील वर्षभरात पाण्याची सरासरी खोली १ मीटर एवढी होती.ह्या अंशाची लांबी ५०० मीटर असून सरासरी रुंदी ६ मीटर आहे. स्थानिक लोकांच्या मतानुसार गेल्या वर्षभरात अंदाजे ४८ तास पूर टिकला असावा.या ठिकाणी ८ महिने (२४० दिवस) पानी टिकून राहते. आणि लोकं इथे मासेमारी करतात, जनावरांना पाणी पाजण्याकरिता आणि धुण्याकरिता आणतात आणि इथल्या पाण्याचा वापर सिंचनाकरिता करतात.इथे लोकांनी कोणतीही भर घातली नसून काही वर्षांआधी लोकांनी श्रमदान करून इथे छोटासा बंधारा बांधला आहे (महत्वपूर्ण बदल), इथून लोकं मासे आणि पाण्याचे महत्वपूर्ण दोहन करतात. लोकांने इथून प्राप्त होणारया लाभात माशांचा, रेतीचा, आणि पाण्याचा समावेश होतो.ह्या ठिकाणापासून लोकांना कोणतीही हानी नाही.

अ. क्र.	जलदृश्य प्रकार	उपप्रकार	नकाशावरील घटकाचा कोड	घटकाचे स्थानिक नाव	पाण्याची सरासरी खोली (मी)	नदी-नाल्यासाठी : लांबी (मी)	नदी-नाल्यासाठी : सरासरी रुंदी (मी)	तलाव-धरणासाठी - सरासरी क्षेत्र (हे.)	पूर कालावधी (दिवस)	पाण्याची उपलब्धता (दिवस)	उपक्रम	महत्वाचे हस्तक्षेप	लक्षणीय बदल	महत्वाचे दोहन	फायदे	हानी

तक्ता १६: निवडक जलभाग- अंश नमुना अभ्यास

पूर्वार्धातील कलम ४.१७ मध्ये चार्चील्याप्रमाणे प्रत्यक्ष पाहणीसाठी निवडलेल्या प्रत्येक जलभाग अंशावर काठा-काठाने जात चाळीस-चाळीस पाहन बिंदू पकडावेत.त्या बिंदूपाश पाण्याचा ओघ कसा आहे, तळाचे स्वरूप काय आहे, व प्रदूषण कोठून व काय प्रमाणात आहे हे नोंदवावे.

अ.क्र.	जलभाग प्रकारचे नाव	जलभाग उपप्रकाराचे नाव	जलभाग अंशाचा (घटकाचा)नकाशा कोड	जलभागाचे बिंदू निरीक्षण				
				नमुना बिंदू क्रमांक	पाण्याचा ओघ	तळाचे स्वरूप	प्रदूषणाचा स्रोत	प्रदूषणाची तीव्रता
	१	२	३	४.१	४.२	४.३	५.१	५.२

४.२ पाण्याचा ओघ

१. सरळ प्रवाह

२. खळाळते पाणी

३. छोटा धबधबा

४. वाहत्या पाण्यातील डोह

५. पूर्ण स्तब्ध पाणी, तळे

६.धबधबा

४.३ तळाचे स्वरूप

१.खडक

२. दगड

३. गारगोट्या

४. रेती

५. चिखल

५.२ प्रदूषणाची तीव्रता

१. कमी

२. साधारण

३. भरपूर

तक्ता १७: निवडक भूभाग-अंशातील बदल

पूर्वार्धातील कलम ४.१६ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नकाशात दाखविलेल्या निवडक भूभाग-अंशाची किंवा तुकड्यांची पाहणी करून माहिती गोळा करायची आहे.यात एक भाग म्हणजे त्या त्या जागी प्रत्यक्ष जाऊन तिथे साधारणतः गेल्या १० वर्षात झालेल्या बदलांची, त्या बदलांमागील कारणांची व बदलांमुळे विशिष्ट गटाला होणाऱ्या फायदे /तोट्यांची माहिती जाणकार व्यक्तींना व्चारून ह्या तक्त्यात भरावी.

नमुन्यादाखल गडचिरोल जिल्ह्यातील येडसकुही गावातील गावालगतच्या जंगलाच्या तुकड्याचे उदाहरण घेऊ य.स्थानिक जाणकार लोकांच्या मतानुसार ह्या तुकड्याचे क्षेत्रफळ कमी झाले आहे, कारण शेतीसाठी याचा बराच भाग मागच्या दशकात वापरण्यात आला.परिणामत: मोठी झाडे कमी होऊन रोपटी व झुडुपे वाढली.ह्यामुळे वनोपज हा फायदा कमी झाला, तर रान डुक्करांचा त्रास भयंकर वाढला,कारण त्यांना लपण्यासाठी झुडुपांची भरपूर वाढ झाली.ह्या बदलामुळे एकीकडे शेतकरी ह्या हितसंबधी गटाचा फायदा झाला,तर वनोपज गोळा करून पोट भरणाऱ्या हितसंबंधी गटाचा तोटा झाला. (तक्ता पुढील पानावर)

अ.क्र.	१. भूभाग प्रकारचे स्थानिक नाव	२. भूभाग उपप्रकाराचे नाव	३. भूभाग अंशाचा कोड नंबर	४. भूभाग अंशाचे स्थानिक नाव	५. गेल्या १० वर्षात क्षेत्रफळात झालेले बदलाचे प्रमाण	६. बदलामागची कारणे	७. गेल्या १० वर्षातील वनस्पती आच्छादनात / प्राणी-जीवनात बदलाचे प्रमाण					८.बदलामागची कारणे
							मोठी झाडे	झुडुपे	गवत,वनस्पती	प्राणी-जीवन (जंगली)	प्राणी-जीवन (पाळीव)	

पुढे सुरू

अ.क्र.	९.लाभ उठवणारे हितसंबंधी		१०.हानी सोसणारे हितसंबंधी		११.लाभात बदलाचे प्रमाण	१२.बदलामागची कारणे	१३.हानीत बदलाचे प्रमाण	१४.बदलामागील कारणे
	स्थानिक	बाहय	स्थानिक	बाहय				

बदलाचे प्रमाण	
१	खूप वाढ
२	थोडी वाढ
३	बदल नाही
४	साधारण घट

५	खूप घट

तक्ता १८: निवडक भूभाग-अंश व्यवस्थापन

पूर्वार्धातील कलम ४.१६ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नकाशात दाखविलेल्या महत्वाच्या,निवडक भूभाग-अंशाची किंवा तुकड्यांबद्दलची माहिती गोळा करायची आहे.या सर्व माहितीचा उपयोग अखेर त्या त्या परिसराचे चांगले व्यवस्थापन व्हावे ह्या दृष्टीने एक कृती आराखडा बनविण्यासाठी करावयाचा आहे.तक्ता क्रमान १८ मध्ये त्या भूभागाशी लागे-बांधे असलेल्या वेगवेगळ्या हितसंबंधी गटांच्या सदस्यांशी व्यवस्थापनासंबंधी चर्चा करून माहिती भरावयाची आहे.यासाठी त्यांना स्वत:ला काय आवडेल, याबरोबरच त्यांच्या दृष्टीने आजमितीस प्रत्यक्ष कृतीत काय आणणे शक्य आहे,याचाही विचार करून सर्वसंमतीने बनू शकेल अशा कृती-आराखड्यात अंतर्भूत करण्यासाठी त्यांच्या कल्पना नोंदवायच्या आहेत.

अ.क्र.	१) भूभाग प्रकारचे स्थानिक नाव	२) भूभाग उपप्रकाराचे स्थानिक नाव	३) भूभाग अंशाचा कोड नंबर	४) भूभाग अंशाचे स्थानिक नाव	५) भूतकालीन व्यवस्थापन	६) सध्याचे व्यवस्थापन अधिकार व ह्यामुळे फायद्यात/तोट्यात असणारे हितसंबंधी गट

						सध्या व्यवस्थापनाचे अधिकार कोणाकडे आहेत?	सध्याचे व्यवस्थापन कोणत्या पद्धतीने चालते?	सध्या कोणत्या स्थानिक हितसंबंधी गटांना लाभ होतो?	सध्या कोणत्या बाह्य हितसंबंधी गटांना लाभ होतो?	सध्या कोणत्या स्थानिक हितसंबंधी गटांना हानी सोसावी लागते?	सध्या कोणत्या बाह्य हितसंबंधी गटांना हानी सोसावी लागते?

पुढे सुरू

अ. क्र.	भूभाग अंशाचे स्थानिक नाव	हितसंबंधी गट	भविष्यात काय व्हायला आवडेल?सध्याच्या व्यवस्थापनात काय बदल झालेले आवडतील?	नवी व्यवस्थापन प्रणाली कशी असावी?	कृती आराखड्यात काय असावे?	व्यवस्थापनात काय बदल झालेले आवडतील?

तक्ता १९: निवडक जलभाग-अंशातील बदल

पूर्वार्धातील कलम ४.१६ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नकाशात दाखवलेल्या निवडक जलभाग-अंशाची किंवा तुकड्यांची पाहणी करून माहिती गोळा करायची आहे.यात एक भाग म्हणजे त्या त्या जागी प्रत्यक्ष जाऊन तिथे साधारणत: गेल्या १० वर्षात झालेल्या बदलांची,त्या बदलामागील कारणांची व बदलांमुळे विशिष्ट गटाला होणाऱ्या फायदे/तोट्यांची माहिती जाणकार व्यक्तींना विचारून ह्या तक्त्यात भरावी.

वाशीम जिल्ह्यातील कारंजा (लाड) नावाच्या शहरालगतच्या पुरातन अशा ऋषी तलावाचे उदाहरण घेऊ य. हा तलाव'मनुष्यनिर्मित तलाव/धरणे' ह्या प्रकारांतर्गत मोडतो.स्थानिक जाणकारांच्या मतानुसार गेल्या १० वर्षात तलावाच्या पाण्याच्या पातळीत खूप घाट झाली आहे,कारण तलावाच्या पाणलोट क्षेत्रात अतोनात जंगलतोड झाल्याने तलावात गाळ साचण्याचे प्रमाण खूप वाढले आहे.आणि जलपर्णीची वाढही

बरीच झाली आहे.गेल्या १० वर्षातील जीवसृष्टीतीत झालेल्या बदलांमध्ये तलावात माशांची बिजावणी सोडण्याची सुरुवात केल्याने माशांचे उत्पादन बरेच वाढले आहे आणि जलपर्णी वाढल्याने भ्रमंती करणाऱ्या पक्ष्यांनी बऱ्याच मोठ्या संख्येने येथे येणे सुरु केले आहे.पण सरपणासाठी पूर्वी तलावाच्या काठावर असणाऱ्या वनस्पती फार कमी झाल्या आहेत.या कारणांमुळे पक्ष्यांचे शिकारी नावाच्या हितसंबंधी गटाचा फायदा झाला आहे, पण त्याच वेळी स्थानिक शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे,कारण पाण्याची पातळी कमी झाल्याने त्यांना सिंचनाकरिता पाणी उपलब्ध होत नाही.काही लोकांनी मत्स्यपालनासाठी हा तलाव लिलावावर घेतल्याने त्यांचा फायदा होत आहे.आधी तलावापासून मिळणारा ‘सिंचनासाठी पाणी’हा लाभ कमी झाला असून मासे नावाचा लाभ वाढला आहे.स्थानिक लोकांच्या मतानुसार व स्थानिक डॉक्टर्सच्या माहितीवरून तलावामुळे गेल्या काही वर्षात डासांचे प्रमाण खूप वाढले आहे व चिकनगुनिया,हिवतापाचा पादुर्भाव वाढला आहे.

अ.क्र.	जलदृश्य प्रकाराचे स्थानिक नाव	जलदृश्य उपप्रकाराचे नाव	जलदृश्य-अंशाचा कोड नंबर	जलदृश्य-अंशाचे स्थानिक नाव	गेल्या १० वर्षात पाण्याच्या उपलब्धतेत झालेल्या बदलाचे प्रमाण	बदलामागील कारणे	गेल्या १० वर्षातील जीवसृष्टीत झालेल्या बदलाचे				
							मासे	खेकडे,शिंपले इत्यादी	पाण्यातील वनस्पती	पाण्याकाठच्या वनस्पती	प्राणी-जीवन (वन्य)
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12

पुढे सुरू

अ. क्र.	बदलामागची करणे	लाभ उठवणारे हितसंबंधी		हानी सोसणारे हितसंबंधी		लाभात बदलाचे प्रमाण	बदलामागची कारणे	हानीत बदलाचे प्रमाण	बदलामागची कारणे
		स्थानिक	बाहय	स्थानिक	बाहय				
	13	14	15	16	17	18	19	20	21

तक्ता २०: निवडक जलभाग-अंश व्यवस्थापन

पूर्वार्धातील कलम ४.१६ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नकाशात दाखवलेल्या महत्वाच्या,निवडक जलभाग-अंशांची किंवा तुकड्यांबद्दलची माहिती गोळा करायची आहे.य सर्व माहितीचा उपयोग अखेर त्या त्या परिसराचे चांगले व्यवस्थापन व्हावे य दृष्टीने एक कृती-आराखडा बनवण्यासाठी करायचा आहे.तक्ता क्रमांक २० मध्ये त्या जलभागाशी लागे-बांधे असलेया वेगवेगळ्या हितसंबंधी गटांच्या सदस्यांशी व्यवस्थापनासंबंधी चर्चा करून माहिती भरावयाची आहे.यासाठी त्यांनी स्वत:ला काय आवडेल,याबरोबरच त्यांच्या दृष्टीने आजमितीस प्रत्यक्ष कृतीत काय आणणे शक्य आहे,याचाच विचार करून सर्वसंमतीने बनू शकेल अशा एका कृती आराखड्यात अंतर्भूत करण्यासाठी त्यांच्या कल्पना नोंदवायच्या आहेत.

तक्ता १९ मध्ये उल्लेखिलेल्या कारंजाच्या ऋषी तलावाचेच उदाहरण घ्या.ह्या तलावाचे भूतकालीन व्यवस्थापन इथल्या मालगुजारांकडे होते.इंग्रजांच्या काळात महसूल-वसुलीसाठी मालगुजारांची (जमिनदारांप्रमाणे)व्यवस्था ह्या क्षेत्रात होती.सध्या याचे व्यवस्थापन सिंचन विभागाकडे आहे.ह्या व्यवस्थापनात दर ५ वर्षांनी तलावाचा लिलाव केला जातो.ठेकेदार ह्या तलावात माशांची पिलावळ टाकतो,पण तलावाच्या अन्य व्यवस्थांवर (उदा.गाळ काढणे)लक्ष दिले जात नही.सध्या ठेकेदार स्थानिकच असल्याने मत्स्यपालक नावाच्या स्थानिक हितसंबंधी गटाला याचा लाभ होतो.बाह्य हितसंबंधी गटांचा सध्या तरी याच्याशी काही विशेष असा संबंध नाही.डासांचे उत्पादन अतोनात वाढल्याने गावातील सर्वच लोकांना याचा त्रास होतो.ह्या तलावाबद्दल निरनिराळ्या लोकांची मते निरनिराळी आहेत.मत्स्य पालकांच्या मतानुसार,

तलावाच्या रॉयल्टीचा दर कमी करण्यात यावा आणि तलावातल गाळ काढण्यासाठी सरकारने मदत करावी;काही प्रकृतीप्रेमिंच्या गटानुसार, हया मासेमारी सरसकट बंद करण्यात यावी.शिकार करून आपले पोट भरण्यासाठी एका समूहानुसार,त्यांना चोरून मारून शिकार करावी लागते,तेंव्हा ज्यांना जर शिकार करण्याची व उन्हाळ्यात तलावाच्या क्षेत्रात थोडी शेती करण्याची परवानगी दिली तर बरे होईल.तिन्ही गटांच्या म्हणण्यानुसार व्यवस्थापन हे सिंचन विभाग व ह्या तिन्ही गटाचे प्रतिनिधी ह्यांच्या संयुक्त विद्यमाने व्हावे.तिन्ही गट एका मुद्द्यावर एकत्र आले;तलावातल गाळ काढला जावा, तलावाच्या वरच्या अंगाने झाडे लावली जावीत,शिकार करणाऱ्यांना काही महिन्यांसाठी शुल्क आकारून जमीन देण्यात यावी आणि त्या शुल्काचा उपयोग तलावाच्या व्यवस्थापनासाठी करण्यात यावा.

तक्ता 20(अ)

अ. क्र.	जलदृश्य प्रकाराचे	जलदृश्य उपप्रकारा	जलदृश्य अंशाचा	जलदृश्य अंशाचे	भूतकालीन	सध्याचे व्यवस्थापन अधिकार व ह्यामुळे फायद्यात/तोट्यात असणारे हितसंबंधी गट

	स्थानिक नाव	चे स्थानिक नाव	कोड नंबर	स्थानिक नाव	व्यव स्थापन	सध्या व्यवस्थापना चे अधिकार कोणाकडे आहेत?	सध्याचे व्यवस्थापन कोणत्या पद्धतीने चालते?	सध्या कोणत्या स्थानिक हितसंबंधी गटांना लाभ होतो?	सध्या कोणत्या बाह्य हितसंबंधी गटांना लाभ होतो?	सध्या कोणत्या स्थानिक हितसंबंधी गटांना हानी सोसावी लागते?	सध्या कोणत्या बाह्य हितसंबंधी गटांना हानी सोसावी लागते?

तक्ता 20(ब)

अ. क्र.	जलभाग अंशाचे स्थानिक नाव	हितसंबंधी गट	भविष्यात काय व्हायला आवडेल?सध्याच्या व्यवस्थापनात काय बदल झालेले आवडतील?	नवी व्यवस्थापन प्रणाली कशी असावी?	कृती आराखड्यात काय असावे?	व्यवस्थापनात काय बदल झालेले आवडतील?

तक्ता २१:निवडक जीवांचे सद्य:प्रमाण व त्यातील बदल

पूर्वार्धातील कलम ४.१० मध्ये चर्चिल्याप्रमाणे स्थानिक जैव विविधतेच्या नोंदणीची सुरुवात लोकांना माहित असलेल्या सर्व जाती/प्रजातींची अथवा अधिक समावेशक वर्गांची (उदा.गांडुळे किंवा गवत) यादी बनवण्यापासून झालेली असेल.ह्या यादीतून अधिक अभ्यासासाठी काही जाती/प्रजाती/वर्ग निवडून तशी नोंद तक्ता क्रमांक ८ मध्ये केलेली असेल.ह्यातील संख्यात्मक अभ्यासासाठी तसेच गुणात्मक अभ्यासासाठी निवडलेले जीव किती प्रमाणात व कोठे आहेत, व यात काय बदल होत आहेत ही माहिती जाणकार व्यक्तींना विचारून गोळा करून टी २१ क्रमांकाच्या तक्त्यात भरावी.या तक्त्यात कोठे आहेत, व यात काय बदल होत आहेत ही माहिती जाणकार व्यक्तींना

विचारून गोळा करून ती २१ क्रमांकाच्या तक्त्यात भरावी.या तक्त्यात निवडलेल्या जीवाला अनुकूल जल/भूभाग प्रकार, जीवाचे अभ्यास-क्षेत्रात सद्य प्रमाण,प्रमाणात गेल्या १० वर्षांत झालेले बदल ह्या गोष्टींचा उल्लेख होईल.

अ.क्र.	जीवाचे स्थानिक नाव	अनुकूल जलभाग /भूभाग प्रकार/उपप्रकार	सध्याचे प्रमाण	गेल्या १० वर्षातील बदलाचे प्रमाण	बदलाचे कारण
	१	२	३	४	५

३ सध्याचे प्रमाण	४ बदलाचे प्रमाण
१ आता आढळत नाही	१ खूप वाढ
२ दुर्मिळ	२ थोडी वाढ
३ साधारण प्रमाणात	३बदल नाही
४ भरपूर	४साधारण घट
	५खूप घट

तक्ता २२: संगोपित (पाळीव आणि लागवडीतील जैव विविधता)

पूर्वार्धातील कलम ४.१० मध्ये चर्चील्याप्रमाणे स्थानिक जैवविविधतेच्या नोंदणीची सुरुवात लोकांना माहित असलेल्या सर्व जाती/प्रजातींची अथवा अधिक समावेशक वर्गांची (उदा.गांडुळे किंवा गवत) यादी बनवण्यापासून झालेली असेल.ह्या यादीतून अधिक अभ्यासासाठी काही जाती /प्रजाती वर्ग निवडून तशी नोंद तक्ता क्रमांक ८ मध्ये केलेली असेल.यातील काही जीवजाती पाळीव/लागवडीतल्या असतील.संगोपित जातींचे अनेक वाण असतात-उदा.आंब्याचे हापूस,पायरी,किंवा नीलम;अथवा म्हशींचे मुर्रा,सुरती किंवा जाफराबादी.अशा महत्वाच्या संगोपित जातींच्या वाणांबद्दलची अधिक माहिती २२ क्रमांकाच्या तक्त्यात भरावी.-१)विविक्षित वां कोणत्या जातीचे आहे, २) ह्या वाणाचे स्थानिक नाव काय आहे,३)ह्या वाणा सारख्या गुणधर्माचे इतर वां,४) ह्या वाणाला फळण्याला अथवा प्रजोत्पादनाला किती कालावधी लागतो,५) ह्याची लागवड/पालन करण्यासाठी कोणत्या पद्धती स्थानिक लोक वापरतात,६)हे वाण जेंव्हा फळते तंव्हा त्याचा आकार केवढा असतो,७) ह्या वाणात काही खास प्रतिकारशक्ती आहे का (उदा.गडचिरोली जिल्ह्यातील अंबाजोग हे धानाचे वां अनेक रोगांना प्रतिकारक आहे),८) ह्याचे वार्षिक उत्पादन (उदा.धानाच्या बाबतीत प्रति एकरी किती क्विंटल धान होतो,एक कडकनाथ कोंबडी वर्षाला किती अंडी देते),९) ह्याचे उपयुक्त उत्पादन (उदा.ज्वारीच्या बाबतीत दाणे व कडबा , कोंबडीच्या बाबतीत अंडी व मांस), १०) ह्याचे स्थानिक महत्व , ११) ह्याचे उपयोग (उपयोग जर औषधी असेल तर कोणत्या लक्षणांसाठी याचा वापर होतो ती लक्षणे नमूद करावीत), १२) ह्या वाणाच्या लागवडीत अथवा पाळण्याच्या प्रमाणात गेल्या १० वर्षात काही फरक पडला आहे का आणि १३) उपयोगात गेल्या १० वर्षात पडलेला फरक (उदा.उप्पागे या झाडाच्या बियांपासून पूर्वी घरी खायला तेल काढत, आता या सर्व बिया औषधी कंपन्याचे एजंट विकत घेतात.)

२२ अ : संगोपित (पाळीव प्राणी)

अ.क्र.	संगोपित जातीचे स्थानिक नाव	जातीचे स्थानिक नाव	या जाती सारख्या इतर जातीची नावे	फळण्याला लागणारा कालावधी	पशुपालन पद्धती	पूर्ण वाढ झाल्यावर आकार (ऊंची / लांबी व वजन)	प्रतिकारक शक्ती:रोग,,पाण्याची तूट , उष्णता इ.विरुद्ध	उपयुक्त उत्पादन	उत्पादनासाठी काळ(दिवस/महिन्याला/वर्षाला) ,किती आणि कोणत्या मापात (10)			स्थानिक महत्व	उपयोग - औषधी असेल तर लक्षण ($)	ह्या वाणाच्या फळण्याच्या प्रमाणात गेल्या १० वर्षांत झालेला बदल	गेल्या १० वर्षांत उपयोगात झालेला बदल
	१	२	३	४	५	६	७	९	काळ	माप	किती	११	१२	१३	१४

($) औषधी उपयोगाचा उल्लेख करण्यास ग्राम पंचायतीतील ग्रामसभांच्या सदस्यांची परवानगी घेऊन . खत म्हणून असेल तर उपयोगी उत्पादन

२२ ब : संगोपित (लागवडीतील जैव विविधता)

अ.क्र.	संगोपित जातीचे स्थानिक नाव	वाणाचे स्थानिक नाव	या वाणा-सारख्या इतर वाणांची नावे	फळण्याला लागणारा कालावधी	लागवड पद्धती	रब्बी/ खरीप/ बारमाही	पूर्ण वाढ झाल्यावरचा आकार ऊंची से. मी.	प्रतिकारक शक्ती:कीड,रोग,चिबड जमीन,पाण्याची तूट इ.विरुद्ध	विशेष महत्व	उपयोग-औषधी असेल तर लक्षण ,खत म्हणून असेल तर उपयोगी उत्पादन, इतर	ह्या वाणाच्या फळण्याच्या प्रमाणात गेल्या १० वर्षांत झालेला बदल	गेल्या १० वर्षांत उपयोगात झालेला बदल	बदलाची कारणे

२२ क : जैव विविधता उपयोग - विविध भाग

अ.क्र.	संगोपित जातीचे स्थानिक नाव	वाणाचे स्थानिक नाव	मुख्य पीक असल्यास			आंतरपीक असल्यास			सुट्टे झाड/वेली असल्यास		
			उपयुक्त उत्पादन	उत्पादनाचे माप प्रती हेक्टर	किती माप	उपयुक्त उत्पादन	बिजाईचे माप	किती उत्पादन प्रती माप	उपयुक्त उत्पादन	माप	किती उत्पादन

स्थानिक महत्व :

१) जास्त महत्वपूर्ण
२) साधारण महत्व
३) महत्वहीन
४) साधारण हानिकारक
५) जास्त हानिकारक

बदलाचे प्रमाण:

१) खूप वाढ
२) थोडी वाढ
३) बदल नाही
४) साधारण घट
५) खूप घट

तक्ता २३: निवडक जीवांचे उपयोग व त्यांतील बदल

पूर्वार्धातील कलम ४.१० मध्ये चर्चील्याप्रमाणे स्थानिक जैवविविधतेच्या नोंदणीची सुरुवात लोकांना माहित असलेल्या सर्व जाती/प्रजातींची अथवा अधिक समावेशक वर्गाची (उदा.गांडुळे किंवा गवत)यादी बनवण्यापासून झालेली असेल.ह्या यादीतून अधिक अभ्यासासाठी काही जाती/प्रजाती/वर्ग निवडून ह्यातील संख्यात्मक अभ्यासासाठी तसेच गुणात्मक अभ्यासासाठी निवडलेल्या जीवांच्या

उपयोगांबद्दलची अधिक माहिती जाणकार व्यक्तींना विचारून गोळा करून ती २३ क्रमांकाच्या तक्त्यात भरावी.ह्या तक्त्यात १)जीवाचे स्थानिक नाव,२) ह्या जीवापासून कोणत्या प्रकारचे उत्पादन मिळते (उदा.मोहापासून खाद्यफुले), ३) ह्या जीवाचा उपयोग (उदा.भुईनिंबाचा- Andrographis paniculata-उपयोग गोंड आदिवासी हिवतापावरचे औषध म्हणून करतात), ४) उपयोगात गेल्या १० वर्षांत झालेला बदल (उदा.नवी पिढी आता मोहाची फुले खात नाही), ५) ह्या जीवाचा कोणता भाग उपयोगात आणतात.(उदा.मोहाची फुले,टोळी इत्यादी),ही माहिती भरावी,

अ.क्र.	जीवाचे स्थानिक नाव	उपयुक्त उत्पादन	उपयोग,औषधी असेल तर लक्षण	उपयोगात झालेल्या गेल्या १० वर्षातल्या बदलाचे प्रमाण	वापरात येणारे भाग
	१	२	३	४	५

४ बदलाचे प्रमाण
जास्त वाढ
साधारण वाढ
बदल नाही
साधारण घट
खूप घट

तक्ता २४: निवडक जीवांच्या व्यवस्थापनाची स्थिती

पूर्वार्धातील कलम ४.१८ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे जीवांबद्दल गोळा केलेल्या सर्व माहितीचा उपयोग अखेर निसर्गसंपत्तीचे चांगले व्यवस्थापन व्हावे जा दृष्टीने एक कृती आराखडा बनवण्यासाठी करायचा आहे.तक्ता क्रमांक २४ मध्ये ह्या दृष्टीने जीवसृष्टीशी लागे-बांधे असलेल्या वेगवेगळ्या हितसंबंधी गटांच्या सदस्यांशी व्यवस्थापनासंबंधी चर्चा करून माहिती भरावयाची आहे.ह्यासाठी तक्ता ८ मध्ये ज्या वन्य तसेच संगोपित जीवांची जास्त माहिती गोळा करण्यासाठी निवड केलेली आहे त्या सर्वांचा, संगोपित जातींच्या वाणांसकट, विचार करायचा आहे.ही माहिती २४ व २५ य दोन तक्त्यात मिळून भरावी.ह्या संदर्भात वेगवेगळ्या हितसंबंधी गटांना स्वत:ला काय आवडेल, याबरोबरच त्यांच्या दृष्टीने आजमितीस प्रत्यक्ष कृतीत काय आणणे शक्य आहे,याचाही विचार करून सर्वसंमतीने बनू शकेल अशा कृती आराखड्यात अंतर्भूत करण्यासाठी त्यांच्या कल्पना नोंदवायच्या आहेत.ह्या कल्पना संरक्षण, चिरस्थायी वापर, लागवड, लालन- पालन, मूल्यवर्धन व विक्री ह्या वेगवेगळ्या पैलुंशी संबंधित असू शकतील.आपण य सर्व पैलूंचा विचार करणे सयुक्तिक ठरेल.

अ. क्र.	जीवाचे स्थानिक नाव	जातीचे नाव	मागील व्यवस्थापन पद्धती	सध्याच्या व्यवस्थापन पद्धती	सर्व वापरकर्ता गट सध्या लाभ घेत आहेत-	फायद्यात बदल	फायद्यांमध्ये बदल होण्याची कारणे	सर्व वापरकर्ता गट सध्या तोट्यात आहेत-	तोट्यात बदल	तोट्यातील बदलाची कारणे	बाह्य वापरकर्ता गट आणि त्यांचे फायदे आणि तोटे

तक्ता २५: निवडक जीव व्यवस्थापन कृती-आराखडा

निवडक जीवांच्या व्यवस्थापनाबाबातीत विविध हितसंबंधी गटांचा कल्पना ह्या तक्त्यात भराव्या. उदाहरणार्थ, सालधरा ग्रामसभेने एका ठिकाणी फळधारणेच्या हंगामात चिंच गोळा करण्याचा निर्णय घेतला आणि जास्त किंमत मिळेपर्यंत साठवून ठेवण्याचे ठरले. हा नफा गावकऱ्यांमध्ये वाटला जाईल.

अ.क्र.	जीव/जीवजाती आणि वाणाचे स्थानिक नाव	हितसंबंधी गट	सध्याचे व्यवस्थापन कसे आहे	सध्याच्या व्यवस्थापनात काय बदल झाला पाहिजे	नवी व्यवस्थापन प्रणाली कशी असावी?	कृती-आराखड्यात काय असावे?
१	२	३	४	५	६	७

तक्ता २६: व्यवस्थापन योजना

पूर्वार्धातील कलम ५.५ मध्ये म्हटल्याप्रमाणे ह्या सर्व कामाचे अंतिम उद्दिष्ट सर्व लोकांच्या,सर्व हितसंबंधी गटांच्या सहमतीने निसर्गसंपत्तीचे संरक्षण,चिरस्थायी वापर व संगोपन करण्यासाठी आणि त्याबरोबरच लोकांच्या विकासाच्या आकांक्षा पुऱ्या करण्यासाठी एक ठोस व्यवस्थापन योजना बनवणे हे आहे.अशा व्यवस्थापन योजनेचा रोख लोकांच्या दृष्टीने जे जिव्हाळ्याचे मुद्दे आहेत त्यांवर असला पाहिजे.हे मुद्दे तक्ता क्रमांक १२ मध्ये नोंदविले आहेत.लोकांच्या दृष्टीने महत्वाच्या भूभागांसाठीचे कृती-आराखडे तक्ता क्रमांक २४ व २५ मध्ये रचिले आहेत.ह्या तक्त्यात वेगवेगळ्या हितसंबंधी गटांच्या इच्छा-आकांक्षाही नोंदवल्या आहेत.य सगळ्या माहितीचा वापर करून एक सर्वसंमती मिळू शकेल अशी व्यवस्थापन योजना ही या सर्व खटाटोपाची फलश्रुती असेल. अशी योजना बनवून ती तक्ता २६ मध्ये नोंदवावी.

अ.क्र.	जिव्हाळ्याचा मुद्दा	संबंधित जीव (जीव अथवा जैविक संसाधने)		संबंधित हितसंबंधी गट	संबंधित जल/भूभाग घटक दृश्य	प्रस्तावित/ व्यवस्थापन योजना	निर्णय घेतल्याचा दिनांक
		संबंधित जीव	संबंधित जैविक संसाधने				

तक्ता २७: रोजगार हमी योजनेअंतर्गत रोजगार अपेक्षिणाऱ्या व्यक्तींची व त्यांच्या कुटुंबांची माहिती

पूर्वार्धातील कलम ४.१५ मध्ये चर्चिल्याप्रमाणे राष्ट्रीय रोजगार हमी योजनेनुसार प्रत्येक कुटुंबातील सर्व व्यक्तींना मिळून प्रतिवर्षी १०० दिवस रोजगार पुरवण्याची हमी दिलेली आहे.महाराष्ट्रात तर ही हमी पूर्ण वर्षाकरिता आहे.या संदर्भात ज्या व्यक्तींना रोजगार हमी योजनेअंतर्गत रोजगाराची अपेक्षा आहे,त्यांच्या बद्दलची व त्यांच्या कुटुंबाची अधिकृत नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती ह्या तक्त्यात भरावी.

तक्ता २७-रोजगार हमी योजनेअंतर्गत रोजगार अपेक्षिणाऱ्या कुटुंबियांची माहिती

अ. क्र.	कुटुंब प्रमुखाचे पहिले नाव	कुटुंब प्रमुखाचे मधले नाव	कौटुंबिक आडनाव	जॉब कार्ड मिळाल्यास कार्ड क्रमांक	पत्ता	पोस्ट / बँक खाते क्रमांक	बँक कोड	कुटुंबातील किती सदस्यांना रोजगाराची गरज आहे?	ती अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आहे का?	जमीन सुधार योजनेत तुम्हाला जमीन मिळाली का?	इंदिरा आवास योजनेचे कोणी लाभार्थी आहेत का?

तक्ता २८:भूभाग /जलभागाशी निगडीत रोहयोअंतर्गत कामे

पूर्वार्धातील कलम क्रमांक ४.१८ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे विविध प्रकारच्या भूभाग/जल भाग घटकांत रोजगार हमी योजनेच्या सहकार्याने बरीच विधायक कामे करता येतील.सर्वसहमतीने पीबीआर मधून गोळा केलेल्या माहितीच्या आधारे विशिष्ट असा भूभाग/जल भाग अंशात करण्याजोग्या कामांचा आराखडा ह्या तक्त्याच्या द्वारे तयार करावा.उदा.मेंढा-लेखात एटजेर नावाच्या भूभाग-घटकात लोकांनी अभयस करून वनतलाव बनवण्याचा निश्चय केला.यासाठी कामाचे स्वरूप (म्हणजे कोणते काम,कोठे,कशा प्रकारे करायचे आहे), कामासाठी लागणारा अंदाजे वेळ,अंदाजे व्यक्ती आणि अपेक्षित फलित यांची चर्चा केली आणि वनतलावाची निर्मिती केली.तसेच विशिष्ट जीव-जातींची रोपे बनविणे किंवा त्यांची माळरानावर लागवड करणे,रान डुक्करापासून शेतीचे संरक्षण करण्यासाठी चर खणणे,अथवा देवराईचे रक्षण करणे.

अ.क्र.	भूभाग/जल भाग अंशाचे नाव	कोड क्रमांक/सर्व्हे नंबर	कामाचे स्वरूप	या कामामुळे परिणाम होणारे संबंधित जीव	हे काम कोणत्या महिन्यात करणे योग्य आहे?	ह्या कासाठी किती मनुष्यबळ लागेल?	या कामाने काय फायदा होईल ?
	१	२	४	३	५	६	७